| | | |
|---|---|---|
| | दिघी पोलीस स्टेशन<br>पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय<br>ई मेल–psdighi.pcpc-mh@gov.in<br>फोन नंबर - ०२०२९९५०४४७ | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
| | प्रेसनोट | दिनांक - १३/०७/२०२३ |

**संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी परतीच्या बंदोबस्तामध्ये पोलीस अंमलदार यांनी बजावलेल्या उत्तम कामगिरीबाबत**

संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी रथामध्ये असलेल्या पादुकांचे दर्शन घेणेकरिता लाखोंच्या संख्येने भाविक जमा होत असतात. दि.१२/७/२०२३ रोजी दिघी पोलीस ठाणेच्या हददीमध्ये संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखी परतीच्या बंदोबस्ताच्या अनुषंगाने ठिकठिकाणी बंदोबस्त लावण्यात आला होता. त्यावेळी संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराजांची पालखी वडमुखवाडी याठिकाणी आली असता सदर ठिकाणी बंदोबस्ताकरिता नेमलेले दिघी पोलीस ठाणेचे पोशि/३४००, रविंद्र पाठे व आरसीपी २ चे पोशि/३५२२३, राहुल कारंडे हे माउलींच्या पादूकांचे दर्शन घेणारे महिलेला चालत्या रथाच्या चाकाखाली येण्यापासून वाचवत असताना पोशि/३४००, पाठे यांचा पाय चाकाखाली येवून फ्रॅक्चर झाला आहे. त्याचप्रमाणे पोशि/३५२३,कारंडे हे किरकोळ जखमी झालेले आहेत. सदर महिलेला रथाच्या खाली येणेपासून वाचविण्यात त्यांना यश आले आहे. वरील दोन्हीही पोलीस अंमलदार यांना प्रथम के.के.केअर हॉस्पिटल वडमुखवाडी येथे ॲडमीट केले. त्यानंतर पुढील उपचाराकरिता पोशि/३४००,कारंडे यांना बिर्ला हॉस्पिटल येथे ॲडमीट करण्यात आले आहे.

पोशि/३४००,पाठे व पोशि/३५२३, कारंडे यांनी केलेल्या अतुलनीय कामगिरीची मा.पोलीस आयुक्त सो. श्री. विनयकुमार चौबे यांनी स्वत: दखल घेवून त्यांना प्रत्येकी १०,००० रु. ची तातडीची मदत जाहीर केली आहे.

(मच्छिंद्र पंडित)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
दिघी पोलीस ठाणे